मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, 1958 कलम 177 अन्वये, जिल्हा परिषदेने आयुक्तांच्या पूर्व मंजुरीने करावयाच्या उपविधीबाबत.

---

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

शासन आदेश क्रमांक-व्हीपीएम्-2693/प्र.क्र.4441/22,

मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 20 डिसेंबर, 1993.

**पहा** :- शासन आदेश, सहकार व ग्राम विकास विभाग, क्रमांकः व्हीपीए-1160/पी, दिनांक 28 एप्रिल, 1962.

## आ दे श

मुंबई ग्रांम पंचायत अधिनियम, 1958 चे कलम 52(1) मधील तरतूदीनुसार, गावाच्या सीमेत इमारत बांधकामासाठी ग्रामस्थांनी ग्राम पंचायतीची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. ग्राम पंचायतीच्या पूर्व परवानगी शिवाय ग्रामस्थांना असे कोणतेही बांधकाम हाती घेता येणार नाही.

2. मुंबई ग्राम पंचायत अधिनियमातील कलम 177(1) मधील तरतूदीनुसार, जिल्हा परिषदेस सर्वसाधारणपणे अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आयुक्तांच्या पूर्व मंजूरीने उपविधी तयार करता येतील, अशी तरतूद शासनाने केली आहे. सदर नियमांच्या पोट कलम 2 अन्वये, 9 – इमारती उभारणे आणि रस्त्यांची आखणी व स्थान, याविषयी जिल्हा परिषदेस उपविधी तयार करता येतील, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर नियमाखाली शासनाने उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकान्वये जिल्हा परिषदेच्या माहितीस्तव नमुना उपविधी तयार करुन दिलेला आहे. त्यानुसार, सर्व जिल्हा परिषदांनी उपविधी तयार करणे आवश्यक आहे. सदर नमुना उपविधीमधील ग्राम पंचायत क्षेत्रात इमारती उभारणी करतांना, त्यासंबंधीची घ्यावयाची दक्षता, रस्त्यांची आखणी, स्थान, इत्यादी विचारात घेऊन घर बांधण्यासाठी पूर्व परवानगी देणे आवश्यक आहे.

3. दिनांक 30 सप्टेंबर 1993 रोजी लातूर /उस्मानाबाद जिल्ह्यांतील किल्लारी, सास्तूर येथे झालेल्या महाप्रलयंकारी भूकंपामुळे तसेच इतर ग्रामीण भागात उदा. होळी, साळींबा इत्यादी गावांमध्ये झालेली भूकंप परिस्थिती लक्षात घेऊन, भूकंपाचा पुढे निर्माण होणारा संभाव्य धोका ओळखून, भूकंप प्रतिबंधक घरे बांधण्याच्या दृष्टीने, रचना करण्याची नितांत गरज असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. जेणेकरुन, भविष्यात भूकंपाची परिस्थिती उद्‌भवल्यास, मोठ्या प्रमाणावर वित्तहानी व प्राणहानी होणार नाही.

4. हे विचारात घेऊन, शासन जिल्हा परिषदांच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिका-यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 मधील कलम 261(1) मधील तरतूदींच्या अधिकाराचा वापर करुन खालील आदेश देत आहे.

(1) मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, 1958 च्या कलम 177(1) मधील तरतुदीनुसार, नवीन इमारतींना बांधकामाची परवानगी देताना अथवा दुरुस्तीची परवानगी देताना ती घरे भूकंप प्रतिबंधक अशी होतील यादृष्टीने, नियोजित इमारतींचा ढोबळ रुपरेषा व अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतरच, त्याचप्रमाणे शासन किंवा जिल्हाधिकारी यांचेकडून, घरे भूकंप प्रतिबंधक असण्याकरिता जे वेळोवेळी आदेश काढण्यात येतील त्यांनुसार, इमारती बांधकामासाठी परवानगी देण्याचे ग्राम पंचायतीवर बंधन राहील यादृष्टीने उपविधी तयार करावेत आणि हे उपविधी व आदेश त्यांच्या जिल्हा अंतर्गत ग्राम पंचायतींच्या निदर्शनास आणून द्यावेत व ग्राम पंचायतींनी वरील उपविधींच्या व आदेशांचे

(कृ.मा.प.)

रोठा/एच-1092(1,000-12-93)

अधिन राहूनच अशा बांधकामांना ग्राम पंचायतींनी पूर्वपरवानगी द्यावी अशा सक्त सूचना त्यांना देण्यात याव्यात.

(2) हे आदेश उपविधी तयार करण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता, त्यासाठी न थांबता वरील आदेश पाळण्याकरिता ग्राम पंचायतींना त्वरीत सूचना द्याव्यात. मात्र जिल्हा परिषदांनी हे उपविधी तात्काळ तयार करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. भि. कुलकर्णी
उपसचिव, महाराष्ट्र शास